राज्यात जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधित झालेल्या शेतक-यांच्या पीक कर्ज माफीबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग
शासन निर्णय क्र. कृकमा ०८१९/ प्र.क्र.११५ /२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १) जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदतीचे निर्णय घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१९.८.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

राज्यात जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदतीचे निर्णय घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.१९.८.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये राज्यात जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधित झालेल्या जिल्हयातील बाधित शेतक-यांचे पीक कर्ज माफ करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यात जुलै २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधित झालेल्या जिल्हयातील बाधित शेतक-यांचे पीक कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. उपरोक्त बाधित शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर योजना महाराष्ट्र राज्याच्या बाधित जिल्हयातील बाधित तालुक्यांतील बाधित शेतक-यांसाठी लागू राहील.

२) मदत व पुनर्वसन विभागाने ठरविलेले निकष आणि जिल्हा महसूल यंत्रणेमार्फत करण्यात आलेला पंचनामा याद्वारे निश्चित केलेल्या बाधित शेतक-यांनाच या योजनेअंतर्गत पीक कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल.

३) सदर योजनेअंतर्गत केवळ प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्था, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत बाधित शेतक-याने घेतलेले खरीप २०१९ हंगामामधील पीक कर्ज लाभास पात्र राहील.

४) सदर योजनेअंतर्गत बाधित शेतक-यांना त्यांनी ज्या बँकेकडून पीक कर्ज घेतलेले आहे त्या बँकेच्या पीक कर्जदरानुसार (scale of finance) एक हेक्टरच्या मर्यादेपर्यंत घेतलेल्या कर्जाच्या मुद्दलाची रक्कम व त्यावरील दि.३१ ऑगस्ट २०१९ पर्यंतची व्याजाची रक्कम अशा एकूण रकमेची कर्ज माफी देण्यात येईल.

५) सदर योजनेसाठी आर्थिक तरतूदीचे आदेश वेगळयाने निर्गमित करण्यात येतील.

६) सदर योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना इ. सारख्या इतर पीक कर्जाबाबतच्या योजनांच्या लाभास पात्र राहणार नाहीत.

७) सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वे व सविस्तर निर्देश सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनाच्या पुर्वमान्यतेने स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.१९.८.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय व मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८२३१५२८२१३५०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, serialNumber=b9bf7a534d8f1272bd902482bf95b556a5baefdddce18574a78fa2d8d0957d1f, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2019.08.23 15:40:02 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव तथा सहनिबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२) मा. मंत्री, महसूल, सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री, वित्त व नियोजन, वने यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री, सहकार, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई
६) मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य (सर्व)
७) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
९) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
१०) मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई
११) मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड प्रादेशिक कार्यालय, पुणे
१२) चेअरमन, राज्य स्तरीय बँकर्स समिती , बँक ऑफ महाराष्ट्र,पुणे.
१३) विभागीय आयुक्त (सर्व)
१४) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

१५) जिल्हाधिकारी (सर्व)

१६) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

१७) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई

१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व)

२०) निवडनस्ती.